# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.09.2024** **वारःशनिवार**

1. देशात येत्या 17 तारखेपासून 2 ऑक्टोबरपर्यंत 'स्वच्छता ही सेवा' मोहीम राबवणार
2. अंदमान आणि निकोबार मधल्या पोर्ट ब्लेअरचं श्री विजय पुरम असं नामकरण करण्याची केंद्रीय गृहमंत्र्यांची घोषणा
3. बासमती तांदूळ आणि कांद्याच्या निर्यातीसाठीची किमान दर मर्यादा केंद्राकडून मागे आणि
4. मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसाठी महावितरणच्या संकेतस्थळाचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**मोहीम**

स्वच्छ भारत अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त देशात येत्या 17 तारखेपासून 2 ऑक्टोबर या कालावधीत ‘स्वच्छता ही सेवा’ ही मोहीम राबवण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या मोहिमेत कार्यालयं, आस्थापनांमध्ये स्वच्छता राखण्याच्या दृष्टिनं विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. स्वच्छता हा एक संस्कार बनावा यासाठी यामध्ये प्रयत्न केले जाणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**नामबदल**

केंद्र सरकारने अंदमान निकोबार बेटांची राजधानी पोर्ट ब्लेअरचं नाव बदललं आहे. पोर्ट ब्लेअर बंदर हे आता 'श्री विजयपुरम' या नावाने ओळखलं जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल समाज माध्यमावरील संदेशाद्वारे ही घोषणा केली. 'देशाला गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांपासून मुक्त करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संकल्प आहे. या संकल्पापासून प्रेरित होऊन गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेअरचं नाव 'श्री विजयपुरम' असं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. 'श्री विजयपुरम' हे नाव आपला स्वातंत्र्यलढा आणि त्यामधील अंदमान निकोबरचं योगदान दर्शवत राहील', असं त्यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**कांदा**

केंद्र सरकारने बासमती तांदूळ आणि कांद्याच्या निर्यातीकरता लावलेली किमान दर मर्यादा हटवली आहे. परदेश व्यापार महासंचालनालयाने काल याबाबत अधिसूचना जारी केली. यापूर्वी सरकारने कांद्यासाठी प्रतिटन साडेपाचशे अमेरिकी डॉलर्स; तर बासमती तांदळासाठी 950 अमेरिकी डॉलर्स किमान दराची मर्यादा निर्यातीसाठी लावली होती. देशांतर्गत बाजारपेठेत दर आणि पुरवठा स्थिर राखण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचललं होतं. दरम्यान देशासह महाराष्ट्रातील लाखो बासमती तांदूळ आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि वाणिज्य - उद्योग मंत्री पियुष गोयल यांचे आभार मानले आहेत.

**पोर्टल**

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या जनसुनवाई पोर्टलचं अनावरण मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते काल मुंबईत झालं. व्यापार आणि उद्योग क्षेत्रातल्या व्यावसायिकांना याद्वारे प्रशासनासोबत थेट आणि पारदर्शकरित्या संवाद साधता येणार आहे. चहा, कॉफी, मसाले, रबर महामंडळ, अपेडा, परदेश व्यापार महासंचालनालय यांच्यासारख्या मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या विभागांचा यात समावेश आहे. ECGC च्या सुधारित SMILE-ERP सुविधेचं लोकार्पणही त्यांनी केलं. जनसुनवाई पोर्टलच्या माध्यमातून निर्यातदारांना त्यांच्या समस्या घरबसल्या सोडवता येणार आहेत.

**राजभाषा संमेलन**

चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला आजपासून आरंभ होत आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित या हीरक महोत्सवी विशेष सोहळ्याचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी एक विशेष टपाल तिकिट आणि नाणं जारी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत असलेल्या राजभाषा विभागांतर्गत भारतीय भाषा विभागाचं उद्घाटन तसंच अनेक पुस्तकं आणि मासिकांचं प्रकाशन करण्यात येणार आहे.

**संविधान मंदिर**

राज्यातल्या 434 शासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून उद्या यांचं उद्घाटन करण्यात येणार आहे. 12 ते 15 तारखेदरम्यान संविधान महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नांदेड, परभणीसह विविध ठिकाणच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून संविधानावर आधारित विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**फडणवीस**

'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचं लोकार्पण काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झालं. 'आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल', असं फडणवीस यांनी यावेळी नमूद केलं. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं आणि भित्तीपत्रकाचं प्रकाशनही फडणवीस यांच्या हस्ते यावेळी झालं. काही लाभार्थी शेतकऱ्यांशी फडणवीस यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. या योजनेत गेल्या सहा महिन्यात दोन लाख शेतकऱ्यांची निवड झाली असून त्यापैकी 45 हजार शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषिपंप बसवण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**आंदोलन**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संविधानाबाबत केलेल्या वक्तव्याविरोधात भारतीय जनता पक्षातर्फे काल राज्यव्यापी आंदोलन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर शहरात क्रांतीचौक इथं राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं. चेंबूर इथं भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या तर अकोल्यात भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आलं. पुणे, जालना, हिंगोली, नंदूरबार, तसंच पालघर जिल्ह्यातही भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी हातात फलक घेऊन राहूल गांधी यांच्या विरुद्ध घोषणाबाजी केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही राहूल गांधी यांच्या कथित वक्तव्याचा निषेध केला आहे. दलित, आदीवासी यांचं आरक्षण कोणीच हिरावून घेऊ शकत नाही, असंही ते म्हणाले.

**सचिन खिलारे**

महाराष्ट्राचा सुपुत्र सचिन खिलारी याने पॅरिस पॅरा-ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात रौप्य पदक पटकावत इतिहास घडवला. तो मूळचा सांगलीचा आहे. पॅरा-ऑलिम्पिकमध्ये मोठं यश मिळवल्यानंतर सचिन काल पुण्यात दाखल झाला; त्यावेळी त्याचं धुमधडाक्यात स्वागत करण्यात आलं. विविध ठिकाणी सचिनचे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले होते. यावेळी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना तो म्हणाला....

**मेळावा-धारशिव**

राज्याचे मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत धाराशिवमध्ये आज शिवसेनेचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. येत्या 17 तारखेला असलेल्या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षाच्या आज  होणाऱ्या मेळाव्यात जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**<u>कोठडी-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग जिल्हयात राजकोट पुतळा दुर्घटना प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या संशयित जयदीप आपटेला 24 सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दुसरा संशयित चेतन पाटील याला यापूर्वीच न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<u>दौरा</u>**

मागील चार-पाच दिवस भामरागड गावात पुराचे पाणी शिरल्याने अनेक नागरिकांची घरं आणि शेतीचे नुकसान झालं. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी काल भामरागडला भेट देऊन पाहणी केली. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नागरिकांना भरपाई देण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश आत्राम यांनी यावेळी दिले.

**<u>गुन्हा-अहमदनगर</u>**

युवकांना लष्करात भरतीचं आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस आणि पुण्याच्या मिलीटरी इंटेलिजन्सनं संयुक्त कारवाई करत एकाला काल अटक केली. विविध राज्यातून शंभरहून अधिक युवकांची या प्रकरणी फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. ही टोळी देहरादून आणि अहमदनगर जिल्ह्यातही बनावट प्रशिक्षण केंद्र उभारून बनावट भरती करत होती. याबाबत माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.